# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 21 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २१ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- ज्ञान आणि नवकल्पनांमुळे भारताची जगभरात नव्याने ओळख- केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचं दावोस परिषदेत प्रतिपादन
- जागतिक आर्थिक परिषदेत कालही राज्य सरकारचे विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार
- जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज अखेरचा दिवस
- लाडकी बहिण योजनेतल्या लाभार्थ्यांची अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याची सूचना
- दिव्यांग प्रमाणपत्र गैरवापर प्रकरणी नांदेड जिल्हा परिषदेचे सात शिक्षक निलंबित

आणि

- बॅडमिंटनपटू सायना नेहवालकडून निवृत्तीची घोषणा

****

ज्ञान आणि नवकल्पनांमुळे भारताची नव्याने ओळख निर्माण होत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं. ते काल स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत माध्यमांशी संवाद साधत होते. सर्वच क्षेत्रात भारताच्या नवीन उपक्रमांबाबत दावोसमध्ये कुतुहल दिसून येत असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट– केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. राज्य सरकारने कालही विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार केल्याची माहिती त्यांनी दिली. राज्य सरकार आणि बर्कले इथलं कॅलिफोर्निया विद्यापीठ यांच्यात धोरणात्मक सामंजस्य करार करण्यात आला. पाच वर्षांच्या या करारामुळे मुंबई महानगर प्रदेशात, महानगर नियोजन आणि शहरी परिवर्तन मजबूत करण्यासाठी शैक्षणिक तसंच संशोधन सहकार्याला चालना मिळणार आहे.

जहाज बांधणी क्षेत्रातल्या योमन कंपनीसोबतही राज्य सरकारने काल सामंजस्य करार केला. ही कंपनी एक हजार ५० कोटी रुपये गुंतवणुकीतून रत्नागिरी इथं जहाजबांधणी उद्योग उभारणार आहे. यातून दीड हजारावर प्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे.

जागतिक पातळीवर आर्थिक घडामोडींमध्ये सक्रीय राहण्यासाठी दावोस परिषद महत्त्वाची असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. ते म्हणाले...

**बाईट– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दरम्यान, क्रॉसरेल या अत्याधुनिक रेल्वे सेवा देणाऱ्या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पॉल डायसन यांच्यासोबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी काल भेट घेतली. या भेटीदरम्यान, बदलती जागतिक औद्योगिक स्थिती आणि भविष्यातील दळणवळण क्षेत्रात रेल्वेच्या भूमिकेबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज अखेरचा दिवस आहे. उद्या अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. याच दिवशी अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल आणि मतदान चिन्ह वाटप होईल. तीन तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि पाच फेब्रुवारीला सकाळी साडे सात ते संध्याकाळी साडे पाच वाजेदरम्यान मतदान होणार आहे. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या गणासाठी प्रत्येकी एक अशी दोन मतं द्यावी लागतील.

**

या निवडणुकीसाठी छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेना तसंच भाजपची युती झाली आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी ही माहिती दिली. तर सिल्लोड तालुक्यात शिवसेना स्वबळावर लढवणार असल्याचं, सिल्लोडचे आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितलं. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं माध्यमांशी बोलत होते.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आघाडी झाली आहे. माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी काल माध्यमांशी बोलतांना ही माहिती दिली. जिल्ह्यातल्या बहुतांश जागांसाठी एकमत झाल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातले ६३ जिल्हा परिषद गट आणि १२६ पंचायत समिती गणांसाठी कालपर्यंत ३४ उमेदवारांनी अर्ज भरले असून, एक हजार ३२६ अर्ज खरेदी करण्यात आले आहेत.

धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी आठ तालुक्यातून जिल्हा परिषदेच्या ५५ गटांसाठी २६० तर पंचायत समित्यांच्या ११० गणांसाठी २५९ अर्ज दाखल झाले आहेत. जिल्ह्यात महायुती आणि महाविकास आघाडीचं जागावाटप अद्याप निश्चित झालं नाही.

****

धनगर आरक्षण प्रश्नी आज मुंबईत आझाद मैदानावर आंदोलनासाठी परवानगी मागणाऱ्या याचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला मुंबई उच्च न्यायालयानं काल नकार दिला. गेल्या वर्षी मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी आझाद मैदानावर आंदोलनासाठी एका दिवसाची परवानगी मागितली होती, मात्र ते सहा दिवस थांबून राहिले होते, याचं न्यायालयानं स्मरण करून दिलं. मैदानाचा वापरलेला भाग आंदोलकांनी जाण्यापूर्वी स्वच्छ करण्याची सूचना दिलेली असतांनाही, तो स्वच्छ न करता सगळे आंदोलक निघून गेले आणि महानगरपालिकेला ते काम करावं लागलं, याकडेही न्यायालयानं लक्ष वेधलं. त्यामुळे या याचिकेवर तातडीनं सुनावणी घेतली जाणार नाही, आंदोलन कधीही करता येईल, असं न्यायालयानं नमूद केलं. या याचिकेवर पुढची सुनावणी येत्या २८ तारखेला होणार आहे.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतल्या लाभार्थ्यांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याची सूचना राज्यातल्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ई – केवायसी करताना चुकीचा पर्याय निवडल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

****

राज्यातल्या नऊ प्रमुख कापूस उत्पादक जिल्ह्यातल्या शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी गोदरेज अग्रोवेट कंपनीनं ग्रामीण उपजीविका अभियानाबरोबर प्रारंभिक करार केला आहे. या उपक्रमाचा लाभ नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशीम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या जिल्ह्यातल्या सुमारे पाच हजार महिला शेतकऱ्यांना मिळणार आहे.

****

नांदेड इथं आयोजित 'हिंद दी चादर' सोहळा जागतिक स्तरावर पोहोचावा, यासाठी सर्व यंत्रणांनी काटेकोर नियोजनासह समन्वयानं काम करण्याचे निर्देश, राज्याच्या अल्पसंख्याक विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले आहेत. शीख धर्मियांचे नववे गुरु श्री तेगबहादूर यांच्या साडे तीनशेव्या हौतात्म्य सत्संग वर्षानिमित्त या आठवड्याच्या अखेरीस हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या तयारीचा मिसाळ यांनी काल दूरदृष्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. स्थानिक स्तरावर होणाऱ्या उपक्रमांमध्ये लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आवश्यक असून विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करण्याचे निर्देशही राज्यमंत्री मिसाळ यांनी दिले.

दरम्यान, या कार्यक्रमानिमित्त जालना इथं आज गांधी चमन ते शिवाजी चौक दरम्यान रॅली काढण्यात येणार आहे. शहरातल्या २१ शाळांमधले सुमारे पाच हजार विद्यार्थी, विविध समाजघटकांचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी–कर्मचारी यात सहभागी होणार आहेत.

****

भारतीय संस्कृतीत सहिष्णुता ही अंतरनिहीत असल्याचं, प्रख्यात इतिहासकार राम पुनियानी यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं विवेकानंद व्याख्यानमालेत ते काल बोलत होते. भारताच्या गुलामगिरीचा इतिहास मांडतांना पुनियानी म्हणाले...

**बाईट– इतिहासकार राम पुनियानी**

दरम्यान, या व्याख्यानमालेचा समारोप आज प्रसिद्ध विचारवंत अपूर्वानंद झा यांच्या व्याख्यानाने होणार आहे.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या सात शिक्षकांनी दिव्यांग प्रमाणपत्राचा गैरवापर केल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी गंभीर गैरवर्तन केल्याचा ठपका ठेवत त्यांना सेवेतून निलंबित केलं आहे.
निलंबन काळात या शिक्षकांना खाजगी व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली असून, त्यांचं मुख्यालय बदलून अन्य पंचायत समित्यांमध्ये हलवण्यात आलं आहे. गटशिक्षणाधिकाऱ्यांना या शिक्षकांविरुद्ध दोन दिवसांत दोषारोपपत्र सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

****

ऑलिंपिक पदक विजेती बॅडमिंटनपटू सायना नेहवालने निवृत्ती जाहीर केली आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे गेली दोन वर्ष सायना खेळापासून दूर होती. मात्र आता दुखणं बळावल्यामुळे आपण खेळणं थांबवत असल्याचं तिने जाहीर केलं. सायनाने २०१२ च्या लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक पटकावलं होतं, जागतिक क्रमवारीत अव्वलस्थान मिळवणाऱ्या सायनाने २०१६ साली रियो द जानरियो ऑलिंपिकच्या वेळी गुडघ्याला दुखापत झाल्यानंतरही २०१७ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक आणि २०१८ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं होतं.

****

राज्यात काल सर्वात कमी अकरा अंश सेल्सियस तापमान यवतमाळ इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल नाशिक इथं अकरा पूर्णांक चार तर जळगाव इथं अकरा पूर्णांक सहा दशांश तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात धाराशिव इथं १३ पूर्णांक चार, नांदेड इथं १४ पूर्णांक दोन, छत्रपती संभाजीनगर इथं १४ पूर्णांक चार तर परभणी इथं पंधरा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****